पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 06/03/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

## पोलीस स्टेशन केळवदला ISO दर्जा प्राप्त
## पोलीस अधिक्षक कडुन केळवद पोलसांचा सत्कार

दिनांक 29/02/2020 रोजी पोलीस स्टेशन केळवद ला ISO–9001 :2015 सर्टिफिकेट प्राप्त झाले आहे. SOAR Counselling services office – Pune तर्फे पोलीस स्टेशन केळवद चे ऑडिट करण्यात आले व Quality Research Organisation तर्फे Certificate of Registration Number 20200229001 GS अन्वये ISO–9001 : 2015 Certificate देणयात आले आहे. सदर ISO Certificate मिळण्याकरिता पोलीस स्टेशन केळवद येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी माहे जुन 2019 ते फरवरी 2020 पर्यंत अतिशय मेहनत घेऊन आयएसओ प्रणाली कार्यान्वीत करण्याची चेक लिस्ट नसार व गुणवंता व्यावस्थापण प्रणालीच्या आवश्यक बाबी दस्तऐवज व अभिप्राय, उपलब्ध सेवांचे मुल्यमापण, गुणवता वस्थापण प्रणालीशी निगडीत सुरक्षा विषयक, प्रशिक्षण विषयक व इतर बाबींची पुर्तता अतिशय मेहनत घेऊन करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन केळवद येथील अधिकार व कर्मचारी यांच्या उत्त्म कामगिरीबद्दल दि. 05/03/2020 रोजी पोलीस मुख्यालय नागपुर ग्रामीण येथे पार पडलेल्या काईम मिटिंग दरम्यान मा. पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला यांनी केळवद पोलीसांना प्रशस्तीप़त्रक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मानिका राऊत, नागपुर ग्रामीनचे सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी, सर्व ठाणेदार व पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्या उपिस्थतीत प्रशस्तीपत्रक (सन्मानपत्र) देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन केळवद ता. सावनेर जिल्हा नागपुरचे शासकिय ईमारतीचे दुरस्तीचे काम नुतनीकरण (Renovation) व सौदय,करण (Beutitication) चे काम करण्यात आले नुतनीकरण अंतर्गत शासकिय ईमारतीचे भिंतीला सिंमेट प्लास्टर, पटिंग, नविन टॉइल्स बसविणे, भिंतीना रंगरंगोटी स्लॉईडिंग, व्हिडिओ, नविन इलेक्ट्रीक फिटिंग, नविन लाईट फँन, अँल्युमिनिअम व्हिडीओ फ्रेम, व नविन ग्लासेस बसविणे महत्वाचे ठिकाणी POP करण्यात आले. पो.स्टे. परिसर व आवारात सौदंर्यीकरण करीता 50 सिमेंट कुंडया खरेदी करण्यात आले आहे. व 200 नग विविध प्रकारचे शो प्लॅट व फुलझाडे खरेदी करून लावण्यात आले. त्यामळे पोलीस स्टेशन केळवद हे सुदंर स्वरूप प्राप्त झाले आहे.

दि. 02/08/2019 रोजी पोलीस स्टेशन केळवदचे ISO Certificate साठी SOARCounselling services office – Pune कडे Application Registration करण्यात आले त्यानुसार ( ISO –9001:2015) प्रणाली कार्यन्वीकरणाची चेक लिस्ट नुसार ISO प्रणालीच्या आवध्यक बाबी दस्ताऐवज व अभिलेख नोटिस बोर्ड संगणक प्रणालीशी निगडीत बाबी, लोक अभिप्राय व उपलब्ध सेवा सविधांचे मुल्यमापण, गुणवता व्यवस्थापण प्रणालीशी निगडीत, सुरक्षा विषयक, प्रिशिक्षण विषयक व इतर बाबींची पुर्तता करण्यात आले आहे.

दिनांक 22/02/2020 रोजी SOAR Counselling services office – Pune चे अधिकारी श्री. समीर रूप्लग यांनी पोलीस स्टेशन केळवद ला भेट देऊन ISO–9001 : 2015 सटिर्फिकेट साठी ऑडिट केली.

ऑडिट दरम्यान गुणवता व्यवस्थापन प्रणालीच्या मानकांनुसार व गुणवता धोरण पुस्तीका नुसार रेकॉडची पडताळणी केली. पोलीस स्टेशनचा प्रयेक विभागाला भेट देऊन तेथील रेकॉर्ड बैठक व्यवस्था, फर्निचर, साहित्याची पाहणी केली PSO चेबंर, दुय्यम अधिकारी कक्ष, आरोपी कोठडी, मुद्देमाल कक्ष, मोहरर रूम क्राईम रूम, बारनिशी कक्ष, सीसीटीएनएस कक्ष, महिला/पुरूष विश्रामगृह पिण्याचे पाणी व्यवस्था, स्वच्छतागृह व तक्रारीची बैठक रूम व्यवस्था, धोका परिक्षण लोक अभिप्राय व पो.स्टे. परिसराची पाहणी करून ऑडीट प्रक्रिया पणु केली.

आयएसओ (9001:2015) प्रणाली नुसार पोलीस स्टेशन केळवद नागपुर ग्रामिण हे महाराष्ट्र पोलीस मार्गदर्शक तत्वानुसार व महाराष्ट्र भारत शासनाने ठरवुन दिलेल्या निकषानुसार नागरिकांना, स्थानिकांना विविध प्रकारचे सेवा पुरविणे, कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवणे, गुन्हयांना आळा घालणे, लोकांना सरक्षा पुरविणे या निकषपुर्ण करित असल्या कारणाने दिनांक 29/02/2020 रोजी Quality Research Organisation तर्फे Certificate of Registration Number–20200229001 GS अन्वये ISO9001 : 2015 Certificate देण्यात आले आहे. date of Certificate 29 जी February 2020 and Certificate Expiry : 28 th February 2023 असा आहे. पोलीस स्टेशन केळवद ला ISO–9001 :2015 Certificate प्राप्त झाले आहे. सदर आयआसओ ISO–9001 :2015 Certificate साठी पोलीस स्टेशन केळवद येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अधिक कष्ट घेतले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. राकेश ओला पोलीस अधिक्षक नागपर ग्रामीण, श्रीमती मोनीका राऊत अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. अशोक सरबंळकर उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात 1) सपोनि सरेश सी. मट्टामी ठाणेदार पो.स्टे. केळवद 2) सपोनि पंकज वाघोडे 3) पोउपनि अर्जुन राठोड 4) सहा. फौजदार मोरेश्वर नांदेकर 5) पोहवा सुभाष रूढे 6) नापोशि राजेन्द्र रेवतकर 7) नापोशि रविन्द्र चटप 8) मनापो अश्विनी निकोसे 9) मनापो प्रिया पाल 10) पोशि धोंडुतात्या देवकते 11) पोशि सचिन येलेकर 12) पोहवा रामराव पवार 13) पोहवा सभाष राठोड 14) पोहवा दिलप ठाकरे 15) पोशि अंकित ठाकरे 16) नापो पंकज ठाकुर 17) पोशि श्रीधर कुलकर्णी, 18) चापोहवा गुणेश्वर डाखोळे 19) चानापा गुणवंता डाखोळे 20) नापो सुरेश निबांळकर 21) एएसआय शैमी शेख 22) पोहवा अमर झिने यांनी कामगिरी केलेली आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. उमरेड :— दिनांक 03/02/2020 चे 12.00 वा. ते 27/02/2020 चे 11.00 वा. आरोपी नामे— सतिश झिरीया, वय 25 वर्ष, रा. रहलोन जिल्हा सिवनी (मध्यप्रदेश) ह.मु. रामनगर नागपूर याने 17 वर्षीय पिडीत मुलीच्या गळयाला चाकु ठेवून मंगळसूत्र व सिंदूर भरून मोबाईलवर फोटो काढून सदर फोटो वडीलाला पाठविण्याची धमकी देवून मांढळ वरून नागपूरला घेवून गेला. यानंतर आरोपीने पीडितेवर बळजबरीने तिच्या मर्जिच्या विरूद्ध शारीरिक संबंध बनविले. तसेच आरोपीने लॉजमध्ये काढलेली फोटो फिर्यादीचे परिवारात व हॅलो ॲपवर तो फोटोचा व्हिडीओ टाकून बदनामी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 376 2(एफ)(एन), 500 भादंवि. सहकलम 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती सुचिता मंडवाले 9763235448 या करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. मौदा :— दिनांक 05/03/2020 चे 20.15 वा. दरम्यान 29 वर्षीय फिर्यादी/पीडित हि आइसक्रिम खायला रबडरीवाला येथे आपल्या मुली सोबत गेली असतांना आरोपी नामे— क्र. 1) किशोर बोरकर तेथे आला व म्हणाला की, ''तु धंदा करते, मी तुला पैसे देतो तरी पण तु माझ्सोबत संबंध ठेवत नाही.'' यावरून फिर्यादीने म्हटले ''तुम्ही दारू पिउन आहात तुम्ही घरी जा, मी तुमच्या घरी येते तेथे बोलते'' तेथुन आरोपी निघुन गेला. यानंतर फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ आरोपीच्या घरी गेले असता आरोपीच्या पत्नीला म्हटले की, ''तुमचा नवरा मला शिविगाळ करीत होता त्याला समजवा'' असे म्हटले असता त्यांनी फिर्यादीला शिविगाळ केली व तुमचा मॅटर तुम्ही बघत बसा असे म्हणुन आरोपी क्र. 1 चा भाऊ आरोपी क्र. 2) शरद बोरकर, 3) संजय बोरकर व 4) किशोर बोरकर यांची पत्नी सर्व रा. लापका मौदा यांना बोलवले ते खाली आल्यावर त्यांनी ''तु वेश्या आहे तुमचे संबंध तुम्ही पहा'' असे म्हणुन त्यांनी फिर्यादीचा हात व मान पकडुन शिविगाळ केली. तसेच किशोर बोरकर यांची पत्नीने सुद्धा हातबुक्याने मारहाण केली व जिवाने मारन्याची धकमी दिली. तसेच फिर्यादीचा लहान भाऊ झगडा सोडवायला मध्यस्ती गेला असता त्याचे कपडे आरोपीतांनी फाडले व जिवाने मारन्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 294, 323, 504, 506, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक बेले हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 01/08/2019 ते दिनांक 05/03/2020 चे 12.00 वा. दरम्यान फिर्यादी यांची 17 वर्षीय मुलगी/पीडित हिच्या सोबत आरोपी नामे– सागर नारायण सनेश्वर, वय 22 वर्ष, रा. शिवमंदीर याने पीडितेचा वारंवार पाठलाग करून सतत बोलण्याचा प्रयत्न करून तिच्याशी मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड) भादंवी. सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि चवरे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर